## प्रकरण – 2 (पुस्तिका – १)
## उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र) प्रनिनिक

**प्रस्तावना**

सन १९७० मध्ये जलस्त्रोतांमध्ये वृध्दी करण्यासाठी या विभागाची स्थापना करण्यात आली नंतर प्रकल्प विभाग असे संबोधण्यात आले तर १९७२ पासून या विभागाला पाणी पुरवठा प्रकल्प विभाग (पा.पु.प्र. विभाग) असे नांव देण्यात आले.

डॉ. चितळे यांच्या समितीच्या शिफारशीनुसार मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठयात वृध्दी करण्यासाठी अनेक प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आणि काम पूर्ण झाले. उदा. मुंबई-१, मुंबई-२, ३, मुंबई ३-अ. पुढील काळातील पाणी पुरवठा वृध्दीसाठी मुंबई-४, मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम पूर्ण झाले.

**संस्थेची संरचना कामे व कर्तव्याबाबतचा तपशील**

प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) यांच्या अखत्यारीतील निरनिराळया पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उभारणीच्या कामांपैकी प्रकल्प नियोजन व नियंत्रण कक्ष या उपविभागातून शहर विभागातील भूस्तरावर /खाली मुख्य जल वाहिन्या टाकणे, भूमिगत बोगद्यांच्या बांधकामाची आणि अनुषंगिक कामे पार पाडली जातात. प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) विभागाच्या अखत्यारीतील मुंबई शहरातील जल अभियंत्यांच्या संबंधित विभागामार्फत नागरिकांच्या प्रचलीत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी कामे करणे.

जागतिक बॅंक सहाय्यित मुंबई - ३ पाणी पुरवठा आणि मलनि:सारण प्रकल्पांतर्गत कामांचे संनियंत्रण करण्यासाठी जागतिक बॅंकेच्या सूचनेनुसार या कक्षाची स्थापना करण्यात आली. मुंबई - ३ प्रकल्पासाठीच्या जागतिक बॅंकेच्या कर्जाची जून १९९६ मध्ये मुदत संपल्यावर बृमुंमनपाने उर्वरीत कामांच्या अर्थपुरवठयासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाशी कर्जासाठी करार केला. ही कामे सुध्दा प्रनिनिक कडून संनियंत्रित केली गेली. मुंमप्रविप्रा सहाय्यित ३- अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्पाचा पहिला टप्पा प्रनिनिक कडून संनियंत्रित केला गेला. कर्जाच्या मुदतीची अंतिम तारीख ३१.०३.२००६ होती. जागतिक बॅंक सहाय्यित मुंबई मलन:सारण प्रकल्प (मुंमप्र) प्रनिनिक कडून संनियंत्रित केला गेला. कर्जाच्या मुदतीची अंतिम तारीख ३१.१२.२००३ होती. या व्यतिरीक्त, 'ग' अर्थसंकल्पांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्प खात्यातील आणि मलनि:सारण खात्यातील चालू आणि नियोजन टप्प्यांवरील भांडवली कामांचे संनियंत्रण प्र.नि.नि.क. कडून केले गेले. जून २००६ पासून प्र.नि.नि.कक्ष हा प्रमुख अभियंता (पापुप्र) या खात्यात समाविष्ट करण्यात आला आहे आणि १.४.२००७ पासून प्र.नि.नि.क.ची पदे उप प्रमुख अभियंता (पापुप्र)नियोजन व संकल्प चित्रे यांच्या आस्थापनेवर समाविष्ट करण्यात आली. ऑक्टोबर २०१२ पासून प्रमुख अभियंता (पापुप्र) यांच्या अखत्यारीतील उपप्रमुख अभि.(पापुप्र)बां-२ यांना वितरीत केलेल्या भांडवली कामांपैकी शहर विभागातील पवई ते घाटकोपर उच्चस्तरीय जलाशय आणि पुढे घाटकोपर निम्नस्तर जलाशय (उर्वरित काम) हे काम उप प्रमुख अभियंता (पापुप्र) प्रनिनिक विभागाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

**संघटनेचा रचनात्मक आराखडा :-**

**उप प्रमुख अभियंता (पा.पु.प्र.) प्र.नि.नि.क.**

| | | |
|---|---|---|
| कार्य.अभि.(पापुप्र)<br>प्रनिनिक<br>(उप प्र. अभि.(पापुप्र)<br>नि.व सं.चित्रे,<br>वरळी येथे कार्यरत) | कार्य.अभि.(पापुप्र)<br>बोगदा शहर | कार्य.अभि.(पापुप्र)<br>पीजी(आर/डब्ल्यू) |
| सहा. अभि.(पापुप्र)<br>प्रनिनिक<br>(उप प्र. अभि.(पापुप्र)<br>नि.व सं.चित्रे,<br>वरळी येथे कार्यरत) | सहा. अभि.(पापुप्र) - १ | सहा. अभि.(पापुप्र)- १ |
| मुख्य लिपिक<br>(रिक्त पद) | दुय्यम अभि.(पापुप्र) – १<br>(रिक्त पद) | दुय्यम अभि.(पापुप्र) - १ |
| लिपिक (रिक्त पद) | मुख्य लिपिक – १ | कनिष्ठ अभियंता (पापुप्र)<br>(रिक्त पद) |
| शिपाई – १ | लिपिक – २ (रिक्त पद) | कामगार – २ |
| | शिपाई – १ | |
| | मुकादम (रिक्त पद) | |
| | कामगार – २ (एआरएफसी-२)<br>कामगार – १ (एआरएफसी-१) | |

**कामकाजाची उद्दिष्टे** :

प्रमुख अभियंता (पापुप्र)खात्याच्या भांडवली कामांपैकी शहर विभागातील पवई ते घाटकोपर उच्चस्तर जलाशयापासून आणि पुढे घाटकोपर निम्नस्तर जलाशयापर्यंत बोगद्याचे बांधकाम (उर्वरित कामे).

**कर्मचारी वृंदाची कर्तव्ये** :

प्रमुख अभियंता (पापुप्र)विभागाच्या अखत्यारीतील शहर विभागातील तसेच उपनगरातील बोगदे व तदनुषंगिक कामे, कंत्राट अटीनुसार नेमलेल्या कंत्राटदाराकडून करुन घेण्यासाठी स्थायी समिती / महानगरपालिकेची मंजूरी प्राप्त करणे. स्थायी समिती / महानगरपालिकेने नेमलेल्या मुख्य निवासी अभियंता (टाटा सल्लागार अभियांत्रिकी) सल्ला / सेवा घेणे.

प्रकल्प बांधकामाच्या प्रगतीनुसार सक्षम अधिका-यांना अहवाल सादर करणे. बोगद्याच्या बांधकामासाठी कार्यरत असलेल्या महानगरपालिकेच्या अभियंत्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

प्रनिनिक या उपविभागाकडून पाणी पुरवठा प्रकल्पाची उभारणी करीत असताना लोकांनी तात्पुरत्या व संभाव्य गैरसोयींबाबत संबंधित अभियंत्यांना व कर्मचा-यांना सहकार्य करणे.

नियोजित बोगद्याची बांधकामे व तदनुषंगिक कामे पूर्ण झाल्यानंतर भूपृष्ठावरील जलवाहिन्यांची मुख्य जलवाहिन्यांना जोडणी करण्याचे काम सुरु करण्यासाठी जल अभियंता खात्यातील संबंधित विभागामार्फत कराव्या लागणा-या संभाव्य पाणी कपातीची सूचना वर्तमानपत्राद्वारे / जाहिरातीद्वारे प्रसिध्द करण्यात येते त्याबाबत लोकांनी त्यांच्या दैनंदिन कामाबाबत दखल घेणे.

प्रमुख अभियंता (पापुप्र)खात्याच्या अखत्यारीतील पाणी पुरवठयासंबंधी बोगदा उभारणीचे व तदनुषंगिक कामे प्र.नि.नि.क. या उपविभागामार्फत सर्वंकष पूर्ण झाल्यानंतर जल अभियंता खात्यातील संबंधित विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येते. सदर बोगद्यांच्या उभारणीमुळे विभागनिहाय पाणी पुरवठयाच्या सोयीत सुधारणा घडून येतात. सदर विभागामार्फत नागरिकांना कोणतीही परस्पर सेवा सुविधा पुरविल्या जात नाहीत.

पाणी पुरवठा प्रकल्प विभागाचा संरचनात्मक तक्ता तसेच जनतेला हवी असलेली विभागाची तपशीलवार माहिती संबंधित अधिका-यांकडून सदर पुस्तिकेमध्ये (मॅन्युअल्स्) उपविभागनिहाय उपलब्ध केली गेली आहे.

प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) यांच्या अखत्यारीतील निरनिराळया पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उभारणीच्या कामांपैकी प्रकल्प नियोजन व नियंत्रण विभाग या उपविभागातूनही भूस्तरावर / खाली मुख्य जल वाहिन्या टाकणे, भूमिगत बोगद्यांच्या बांधकामाची आणि अनुषंगिक कामांचे काही प्रकल्प पार पाडले जात आहेत.

| कार्यालयाचे नांव | उप कार्यालयाचे नांव | उप कार्यालयाचा पत्ता | उप कार्यालयाच्या प्रमुखाचे नांव व हुद्दा | उप कार्यालय प्रमुखाच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) | उप प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) प्रकल्प नियोजन व नियंत्रण कक्ष | उप प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) प्रकल्प नियोजन व नियंत्रण कक्ष, रुम नं. ३१७/३१८, जी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८ | श्री. सु. रा. महाजन. उप प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) प्रकल्प नियोजन व नियंत्रण कक्ष. (प्र.) | २४२२२१३१ |

सही/-
(श्री. सु. रा. महाजन.)
उप प्रमुख अभियंता (पापुप्र) प्रनिनिक (प्र.)